23/08/2024, 12:24 16503405936226418597108675690405 - Dr Vinod Raut.jpg

डॉ. राऊत

UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*
IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा

**डॉ. विनोद राऊत**
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.
९८९०३१३१५७
neelvin16@gmail.com

**सारांश :—**

धम्मक्रांतिनंतरची अभूतपूर्व घटना म्हणजे दलित–आंबेडकरवादी साहित्यप्रवाहाचा उदय होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उर्जामयी विचार घेऊन लिहिणाऱ्या आंबेडकरी प्रज्ञा प्रतिभांनी एकूणच मराठी साहित्याचे क्षितीच विस्तारत नेण्याचे कार्य केले आहे. मानवी जीवनाला नवा अर्थ देणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या विचारभूमीतून परिवर्तनाचा वसा घेत आपली अभिव्यक्ती साकारणाऱ्या आंबेडकरवादी कवींसोबत आंबेडकरवादी कवयित्रींची कविताही अधिक ठसठशीत, समृद्ध व परिपक्वतेने अभिव्यक्त होत गेली आहे. पुरूषांच्या अनुभूती व अनुभवविश्वापेक्षा स्त्रीचे अनुभवविश्व वैविध्यपूर्ण असते. या अनुभवविश्वाचेच कितीतरी आगळे पदर आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत दिसतात. पारंपरिक भावलेखन करणाऱ्या मराठी कवयित्रींपेक्षा आंबेडकरवादी कवयित्रींच्या जाणिवांचे आकाश वेगळे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगद्रष्ट्या व्यक्तिमत्त्वामुळेच आपल्या आयुष्याला सुंदर अर्थ प्राप्त झाला याची प्रचिती आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता वाचल्या की येते. म्हणूनच आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेरणा म्हणजे वेदना, विद्रोह व ज्ञानाच्या विशाल महासागर ठरलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे अवघे आयुष्य होय, हे सिद्ध होते.

**प्रस्तावना :—**

जीवनाची रसरशीत अभिव्यक्ती साकारणारा वाङ्मय प्रकार म्हणजे कविता अवघ्या मराठी कवितेत अत्यंत महत्त्वाची कविता म्हणून आंबेडकरवादी कवितेचा विचार करावा लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्रोहाचे रसायन आहे; मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान आहे. ह्या तत्त्वज्ञानाने धम्मक्रांतिनंतर अनेक पिढ्या संस्कारित झाल्यात. कालपर्यंत मोकळे न होऊ शकणारे स्वर धम्मक्रांतिनंतर उत्स्फूर्तपणे गाऊ लागले. वाट्याला आलेली व्यथा–वेदना सांगू लागले. हजारो वर्षांच्या दलितत्त्वाच्या वेदनेतून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून आंबेडकरवादी कवितेचा जन्म झाला. एक अनोखे जीवनदर्शन आंबेडकरवादी कवितेने मराठी वाचकांसमोर ठेवले. विद्रोह, वेदना आणि प्रस्थापितांच्या साहित्यमूल्यांना नकार देत आंबेडकरवादी कविता मराठी कवितेत आशयाभिव्यक्तीच्या सिंहासनावर विराजमान झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतदर्शी तत्वज्ञानाने फुललेल्या आंबेडकरवादी कवींच्या कवितेसोबतच आंबेडकरवादी कवयित्रींची कविताही समृद्धपणे अभिव्यक्त झाली आहे. आंबेडकरी कवींच्या तुलनेत सुरूवातीला काहीशी दुर्लक्षित राहिलेली पण आशय–अभिव्यक्तीचे नवे आणि धारदार शस्त्र होत, जीवनाच्या अनेक अंगांना कवेत घेत निर्माण होत गेलेली आंबेडकरवादी कवयित्रींची कविता एकूणच मराठी कवितेत दमदारपणे वाटचाल करते आहे. सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, सुरेखा भगत, कुमुद पावडे, ज्योती



https://drive.google.com/file/d/1ONGhbP0xHvaR0YM6iJPUyQxWV-A_jGYJ/view 1/1